राज्यातील सार्वजनिक आरोग्य व प्रशिक्षण संशोधन आणि धोरण बळकट करण्याकरीता Public Health Foundation of India (PHFI), नवी दिल्ली या संस्थेबरोबर केलेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने प्रशिक्षण सत्रासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः PHFI-२०२५/प्र.क्र.१७/क्षमता बांधणी ई क्र. १२१२६८६

गो.ते.रुग्णालय संकुल, दहावा मजला, संकुल इमारत

मंत्रालय, मुंबई ४००००१

दिनांक : २५ जून,२०२६.

वाचा :- १. Director-Training, "Public Health Foundation of India (PHFI), New Delhi" यांचे पत्र क्रमांक-PHFI/PHM-Maharashtra/००६/२०२६, दि.१२.०३.२०२६.

२. संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर यांचे पत्र जा.क्र. राआकुकसं/कक्ष-५/ PHFI Proposal/४००१-०३/२०२६ दि.२०/०४/२०२६

३. संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर यांचे पत्र जा.क्र. राआकुकसं/कक्ष-५/ PHFI Proposal/५९७०-७४/२०२६ दि.०५/०६/२०२६

प्रस्तावना :-

राज्यातील आरोग्य विषयक सेवा वृध्दींगत करण्यासाठी, आरोग्य व्यवस्थेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना "Public Health Foundation of India (PHFI), New Delhi" या तज्ञ संस्थेमार्फत ६ दिवसांचे प्रशिक्षण देण्यासाठी सामंजस्य करार Memorandum of Understanding (MoU) मा. मुख्यमंत्री महोदय व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण महोदयांच्या उपस्थितीत दि.३० जुलै, २०२५ रोजी करण्यात आला आहे. त्यानुसार गट-अ संवर्गातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रति सत्र-३० प्रशिक्षणार्थी असे १० सत्रांचे नियोजन आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये करण्यात आले असून, Public Health Foundation of India (PHFI), नवी दिल्ली यांनी आकरलेल्या प्रशिक्षण खर्चास तसेच १० सत्रांचे आयोजन व नियोजन करण्याकरिता राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (PHI) यांना सदर प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी येणाऱ्या निवास, आहार व कार्यालयीन खर्च इ. खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

Public Health Foundation of India (PHFI), नवी दिल्ली यांच्यामार्फत गट-अ संवर्गातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचेकरीता सार्वजनिक आरोग्य संकल्पांमध्ये व्यवस्थापकीय आणि नेतृत्व कौशल्ये वाढविणेबाबत ६ दिवसांचे कार्यशाळा / प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. प्रति सत्र-३० प्रशिक्षणार्थी असे १० सत्रांचे (३०० प्रक्षिणार्थी) नियोजन करण्यात आले आहे. त्याकरीता प्रति सत्र रू-१०,५०,०००/- (अक्षरी रू- दहा

लक्ष पन्नास हजार फक्त) (GST सह) आकारलेले आहे. याप्रमाणे १० सत्रांचे एकूण रु-१,०५,००,०००/- (GST सह) (अक्षरी रू-एक कोटी पाच लाख फक्त) इतकी रक्कम संस्थेस अदा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये प्रशिक्षण मानधन, प्रशिक्षण साहित्य व पुस्तिका, प्रशिक्षण निवास व प्रवास खर्च प्रशिक्षण संनियंत्रण इत्यादींचा समावेश आहे.

२. "Public Health Foundation of India (PHFI), New Delhi" यांना एकूण-१० सत्रांसाठी एकूण रु-१,०५,००,०००/- (GST सह) (अक्षरी रू-एक कोटी पाच लाख फक्त) इतकी रक्कम मुख्य लेखशीर्ष-२२११०१०२ ,००३,प्रशिक्षण,(०१) कुटुंब कल्याण प्रशिक्षण, (०१)(०१) प्रादेशिक कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), (२८) व्यावसायिक सेवा या उद्दिष्टाअंतर्गत सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर असलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

३. चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर येथील ३ प्रशिक्षण सत्रांचे नियोजनाकरिता येणाऱ्या खर्चास मुख्य लेखाशीर्ष-२२११०१०२, ००३,प्रशिक्षण,(०१) कुटुंब कल्याण प्रशिक्षण, (०१)(०१) प्रादेशिक कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), मधील उद्दिष्ठाअंतर्गत खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यास येते.

(चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर-३ प्रशिक्षण सत्रे)

अ. क्र	संस्थेचे नाव	बाब/उद्दिष्ट	दर/निकष (प्रतिसत्र) (रु)	एकूण ३ सत्रांसाठी (रु)
१	PHFI संस्था (प्रशिक्षण शुल्क, साहित्य व समन्वय)	(२८-व्यवसायीक सेवा)	१०,५०,०००/-	३१,५०,०००/-
२	चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रयोधिनी, चंद्रपूर (आहार, निवास व्यवस्था, सभागृह भाडे)	(२८-व्यवसायीक सेवा)	२,०५,५००/-	६,१६,५००/-
३	राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (समन्वयक व सपोर्ट स्टाफ मानधन)	(२८-व्यवसायीक सेवा)	३,६००/-	१०,८००/-
४	राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (प्रशीक्षण साहित्य)	(१३-कार्यालयीन खर्च)	५०,०००/-	१,५०,०००/-
		एकूण अंदाजित खर्च (रु)	१३,०९,१००/- (अक्षरी रु-तेरा लाख नऊ हजार शंभर फक्त)	३९,२७,३००/- (अक्षरी रु-एकोणचाळीस लाख सत्तावीस हजार तीनशे फक्त)

विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र येथील ७ प्रशिक्षण सत्रांचे नियोजनाकरिता येणाऱ्या खर्चास मुख्य लेखाशीर्ष-२२११०१०२, ००३,प्रशिक्षण,(०१) कुटुंब कल्याण प्रशिक्षण, (०१)(०१) प्रादेशिक कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), मधील उद्दिष्ठाअंतर्गत खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यास येते.

(विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र -७ प्रशिक्षण सत्रे)

अ. क्र	संस्थेचे नाव	बाब/उद्दिष्ट	दर/निकष (प्रतिसत्र) (रु)	एकूण ७ सत्रांसाठी (रु)
१	PHFI संस्था (प्रशिक्षण शुल्क, साहित्य व समन्वय)	(२८-व्यवसायीक सेवा)	१०,५०,०००/-	७३,५०,०००/-
२	आवकुकप्रकेंद्र (नाश्ता, जेवण व्यवस्था)	(१९-आहार)	७३,५००/-	५,१४,५००/-
३	आवकुकप्रकेंद्र (निवास व्यवस्था, सभागृह भाडे, कार्यालयीन खर्च)	(१३-कार्यालयीन खर्च)	१,४०,०००/-	९,८०,०००/-
४	राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (प्रशीक्षण साहित्य)	(२८-व्यवसायीक सेवा)	३,६००/-	२५,२००/-
		एकूण अंदाजित खर्च (रु)	१२,६७,१००/- (अक्षरी रु-बारा लाख सदुसष्ठ हजार शंभर फक्त)	८८,६९,७००/- (अक्षरी रु-अठ्ठ्याऐंशी लाख एकोणसत्तर हजार सातशे फक्त)

सदर खर्च सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरीता मुख्य लेखशीर्ष-२२११०१०२ अंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हे आदेश, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७५ मध्ये दि १७.०४.२०१५ मधील उपविभाग क्र .४ मधील अ .क्र .१०, नियम क्र १० अन्वये, प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०६२५१२१४४५३५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ARVIND BHIMRAO MORE

Digitally signed by ARVIND BHIMRAO MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=203AF2DFBA7DB2A4824298A34F2C9294F93396F53D7F87CD4D69FECF5CF7005F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9246B8CCD2E2CB10707678D45EA1AD26CC1E4D7BFF7BD2AA1F253A716B8C448B, cn=ARVIND BHIMRAO MORE
Date: 2026.06.25 12:59:16 +05'30'

(अ.भि.मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/२, मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक १/२), आरोग्य सेवा, मुंबई/पुणे.
४. उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर

५. संचालक,राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर
६. डॉ. शुमा राठोड, प्राचार्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
८. निवडनस्ती (क्षमता बांधणी).